# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)


क्र. मजनिप्रा/२०१९/PRCL/TIDC/१११/३६७ दिनांक : ०९/०५/२०१९

प्रति,
कार्यकारी संचालक
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
सिंचन भवन, आकाशवाणी चौक,
जळगाव - ४२५ ००१.

विषय : वाघारी (वाडी वाघारी) साठवण तलाव, ता. जामनेर, जि. जळगाव - यांस मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : का.सं. तापाविम जळगाव यांचे पत्र क्र. कासं/तापाविम/प्रशा-५/१४०४/सन-२०१९ दि. ०७/०३/२०१९

१.० संदर्भीय पत्रान्वये वाघारी (वाडी वाघारी) साठवण तलाव, ता. जामनेर, जि. जळगाव - यांस मजनिप्राची प्रस्ताव मान्यता मिळणेबाबत प्राप्त झाला आहे.

२.० सदर प्रस्तावाची महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) अधिनियम, २००५ च्या कलम ११(च) नुसार छाननी केली असता सदर प्रकल्पाच्या पाणीसाठ्याची किंमत प्रति सघमी मापदंडापेक्षा जास्त येत असल्याने सदर प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य वाटत नाही.

३.० मा. राज्यपाल यांच्या २०१९-२० साठीच्या निदेशातील परिच्छेद १७ मधील तरतुद खालील प्रमाणे आहे;

> *........ मा. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, जोपर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता, निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याचा दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांचे काम हाती घेऊ नये. ....*


9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.
Tel.: +91-22-2215 2019, Email : mwrra@mwrra.in I Website : www.mwrra.org

तसेच मजनिप्रा अधिनियम कलम ११(च) मधील तरतुद खालील प्रमाणे आहे;

> *..... परंतु, नदी-खोरे अभिकरणांनी प्रस्तावित केलेल्या, बांधकाम करावयाच्या नवीन जलसंपत्ती प्रकल्पांना संबंधितांकडून मान्यता देतांना, प्राधिकरण प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी गुंतवणुकीला अग्रक्रम देण्यासंबंधात, राज्यपालांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशांचे काटेकोरपणे पालन होत असल्याबद्दल खात्री करील;*

उपरोक्त तरतुदींचा विचार करता सदर प्रकल्पास चालू प्रकल्पावरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ न देता निश्चित कालमर्यादेत प्रस्तावित प्रकल्प पुर्ण होण्यासाठी निधी कसा उपलब्ध करून दिला जाणार आहे याबाबतचे नियोजन मा. राज्यपाल महोदयांना सादर करून त्यांची प्रथम प्रकल्प हाती घेणेस अनुमती घ्यावी.

४.० उपरोक्त परि. २ व ३ चे पूर्ततेसाठी प्रस्ताव परत करण्यात येत आहे.

(रसिक चौहान)
सचिव

प्रत

१) प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड मुंबई - ४०००३२.

२) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, आकाशवाणी चौक, जळगांव - ४२५ ००१.

३) अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, गिरणा भवन, जळगाव - ४२५ ००१.